दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • शुक्रवार दि.३ एप्रिल २०२६ • अंक-८० • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

## राज्यात पुढील ४ दिवस अवकाळीचा इशारा

**मुंबई**-राज्यात पुढील तीन ते चार दिवस वादळी पावसाचे वातावरण राहणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विविध भागांत ढगाळ वातावरणासह वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असून काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये आज हलक्या सरींची शक्यता असून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.मध्य महाराष्ट्रातील परिस्थितीही चिंताजनक असून पुणे, सातारा आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये काही भागांत गारपीट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या भागांत वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० किलोमीटरपर्यंत जाऊ शकतो.

# उद्योगांना एलपीजीचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील-राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रात कार्यरत असलेली प्रत्येक विदेशी कंपनी ही राज्याचीच आहे, या भूमिकेतून राज्य शासन सर्वतोपरी काळजी घेत आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे एलपीजी गॅसच्या जागतिक तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्वदेशी उद्योगाबरोबर विदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना तसेच नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी राज्य शासनामार्फत आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगून या संकटात कोणत्याही उद्योगाला राज्य शासन अडचण येऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केली.

राज्यातील एलपीजीच्या पुरवठ्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले, जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने आणि शिपिंग कंपन्यांकडून दरवाढ झाल्याने अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. त्यांच्या निर्देशानुसार राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली परिस्थिती हाताळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एलपीजी पुरवठ्याचे टप्प्याटप्प्याने वितरण सुरू असून प्राधान्य क्षेत्रांना दिलासा देण्यात येत आहे.एलपीजीच्या काळाबाजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष आणि हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आले आहेत. हे क्रमांक सर्व नागरिक आणि उद्योजकांपर्यंत पोहोचविण्याची सूचना करुन मंत्री जयकुमार रावल यांनी नागरिक आणि उद्योगांकडून येणाऱ्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करण्याचे तसेच दरवाढ किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले.सध्यस्थितीत कोणत्याही विदेशी उद्योगांना एलपीजीचा पुरवठा झाला नसल्याबाबत तक्रार नाही. त्यामुळे उद्योजकांनी काळजी न करता सहकार्य करावे, असे आवाहन सचिव डॉ.गवांदे



यांनी यावेळी केले.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार पहिल्या टप्प्यात हॉस्पिटल्स, शैक्षणिक व सामाजिक संस्था, दुसऱ्या टप्प्यात रेस्टॉरंट्स व अन्न उद्योग, तर तिसऱ्या टप्प्यात कामगारप्रधान उद्योगांना एलपीजी पुरवठा करण्यात येत आहे. या अनुषंगाने उर्वरित उद्योगांची यादी अंतिम करून पुढील एक-दोन दिवसांत पुरवठा सुरळीत करण्यात येणार असल्याची माहिती श्री.डांगे यांनी यावेळी दिली. बैठकीत पीएनजी (पाईप्ड नॅचरल गॅस) सुविधेच्या विस्ताराला गती देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाबाबत माहिती देण्यात आली. शहर गॅस वितरण प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या जलदगतीने देण्यात येत असून रस्ते खोदकाम, पाईपलाईन टाकणे आदी कामांना २४ तास परवानगी देण्यात आली आहे. बहुतांश कामे या महिन्यात पूर्ण होतील असे यावेळी सांगण्यात आले.या बैठकीत उपस्थित परदेशी प्रतिनिधींनी राज्य शासनाच्या पारदर्शक आणि सकारात्मक भूमिकेचे स्वागत केले. संकटाच्या काळात केंद्र व राज्य शासन एकत्रितपणे काम करत असून पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याबद्दल त्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले.सध्याचे संकट तात्पुरते असून परिस्थिती लवकरच सामान्य होईल, असा विश्वास व्यक्त करुन राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी राज्यातील उद्योग व नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले.

## प्रभाग ९ मधील कचरा समस्या बाबत अमोल बालवडकर यांची महापालिके सोबत बैठक

**पुणे । रमेश जयस्वाल**

बाणेर ,बालेवाडी,पाषाण,सुस, सोमेश्वर वाडी ,म्हाळूंगे,सुतार वाडी विभागात कचऱ्याची समस्या बिकट/ नियमाने सफाई होतच नाही ,कचरा उचल केला जात नाही / औध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाचे डी एस आय भोईर अकार्यक्षम अधिकारी / कर्मचाऱ्यावर वचक नाही





पुणे विभागातील औध- बाणेर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या बाणेर बाणेर ,बालेवाडी,पाषाण,सोमेश्वर वाडी,सुतार वाडी,म्हाळूंगे ,सुस या प्रभाग ९ मधील वाढत्या कचरा समस्येवर उपाययोजना करण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली या प्रसंगी उपस्थित नगरसेवक अमोल बालवडकर यांनी अनेक मूद्दे या बैठकीत मांडले या बैठकीत घनकचरा विभागाचे उपायुक्त सपकाळ यांच्या उपस्थितीत अनेक समस्या मांडण्यात आल्या या प्रभागातील कचरा व्यवस्थापन सुधार करण्यासाठी ठोस उपाययोजना आखण्यात आल्या कचरा योग्य संकलन,वर्गीकरण ,गावठाण आणि ईतर ठिकाणी साचणारा कचरा तातडीने उचलणे ,दूकानदार,टपरी आणि पथारी वाल्यांना डस्टबीन वापराची सक्ती करणे ,अनाधिकृत कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करणे तसेच या प्रभागासाठी नवीन कचरा संकलन गाड्या , ढकलगाड्या उपलब्ध करणे ठरले या बैठकीत महापालिकेचे नगरसेवक अमोल बालवडकर,नगरसेविका रोहीणी चिमटे,सह आयुक्त नायकल उपस्थित होते

**प्रत्यक्षात अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यावर वचक नाही**

औंध -बाणेर महापालिकेचे क्षेत्रीय कार्यालयाचे डी एस आय भोईर यांचा अनागोंदी कारभार सुरू आहे बालेवाडी स्टेडीयम समोर एक महिन्या पासून कचरा साचलेला असतो घाण वास येते वृत्त पत्रात बातमी येते तरी पण मगरगट्ट अधिकारी यावर कारवाई करत नाही शेवटी अमोल बालवडकर यांनी पूढाकार घेत हा प्रश्न सोडविला या प्रभाग क्रमांक ९ मध्ये अनेक ठिकाणी कचरा साचलेला असतो रोज साफ सफाई तर होतंच नाही जागो जागी कचरा साचतो असतांनाही याचे मुकरदमसह कर्मचारी अर्थकारण कूठे जूडते यावरचं लक्ष देत आहे अनेक वेळेस कचरा समस्या बाबत भोईर यांना कल्पना दिली तरी यांचे कोणीही ऐकावयास तयार नसल्याचे वृत्त आहे कचरा संकलन करणारे आणि साफसफाई करणारे हे बाहेरील राज्यातील अर्थकारणात बूडलेले हे सर्व अधिकारी आणि कर्मचारी जनतेच्या समस्यांची जाण कशी ठेवणार आज या विभागात जागो जागी कचरा साचलेला दिसतो हे भोईर यांना कळत नाही काय या कचऱ्या समस्यांबाबत दोषी असेल तर भोईरचं यांची या कार्यकाळात झालेल्या सर्व कामांची सखोल उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक आहे आणि यांची या विभागातून बदली करण्यात यावी अशी जनतेची मागणी आहे

## राज्यात अवकाळीचा फटका:पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत दिली जाईल;कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंचे आश्वासन



**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात वादळी वारा व गारांच्या पावसामुळे (अवकाळी) १ लाख २२ हजार हेक्टरहून (३ लाख ५ हजार एकर) अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन तातडीने पंचनामे पूर्ण करुन बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी गावातील नुकसान झालेल्या आंब्याच्या बागांचे तसेच विविध शेती पिकांचे प्रत्यक्ष पाहणी केली. अवकाळी पावसामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. अनेक ठिकाणी फळगळ, झाडांचे नुकसान तसेच उभ्या पिकांवर परिणाम झाल्याचे दिसून आले. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.मार्च महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यभर मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः नाशिक (२९,८१२ हेक्टर), अहिल्यानगर (२३,६३३ हेक्टर), जळगाव (२२,३६१ हेक्टर), धुळे (१४,८३२ हेक्टर), बुलढाणा (८,५०७ हेक्टर) व छत्रपती संभाजीनगर (८,४४५ हेक्टर) आदी जिल्ह्यातील लाखो हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत.राज्यात केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, कलिंगड, भाजीपाला, डाळिंब, कांदा, संत्रा, द्राक्ष आदी पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी कांदा कुजला असून पपईची रोपेही खराब झाली आहेत. शेतात पाणी साचल्याने उभी पिके आडवी झाली असून मजुरी व खतांचा खर्च वाया गेला आहे.

# ठाणे मनपाच्या उत्पन्नाला शीळ भागातील अनधिकृत गोडाऊनची घरघर;दिव्यात नियोजनबद्ध विकासाला 'ब्रेक'

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात, विशेषतः दिवा-शीळ रस्ता, भारत गिअर ते पोलीस स्टेशन आणि दिवा ब्रिज ते शिळफाटा या परिसरात गेल्या काही वर्षांत अनधिकृत गोडाऊनचे पेव फुटले आहे. २०२२ ते २०२६ या प्रशासकीय राजवटीच्या काळात या अनधिकृत बांधकामांमध्ये प्रचंड वाढ झाली असून, यामुळे शहराच्या नियोजनबद्ध विकासाला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. शिवसेना नगरसेविका सौ. अर्चना निलेश पाटील यांनी या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.दिवा प्रभागात हजारोच्या संख्येने पत्र्याची मोठी गोडाऊन उभी राहिली आहेत. ही बांधकामे करताना महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी घेतली नसल्यास यामुळे पालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ शकते. या गोडाऊनमधून कोणत्या प्रकारचे व्यवसाय चालतात, याची कोणतीही नोंद प्रशासनाकडे नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यांना व्यावसायिक 'मालमत्ता कर' भरावा लागतो का याची माहिती पालिका प्रशासनाने अद्याप संबंधित लोकप्रतिनिधींना दिलेली नाही. यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर मोठा दरोडा पडत असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.




उत्पन्नाचा हा मोठा स्रोत अनधिकृत धंद्यांमुळे आटला आहे.असुरक्षितता आणि आगीचा धोका: या पत्र्याच्या शेडमध्ये ज्वलनशील पदार्थांची साठवणूक किंवा अनधिकृत कारखाने चालवले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नियोजनशून्य पद्धतीने बांधलेली ही गोडाऊन आगीच्या घटनांना निमंत्रण देत आहेत.अग्निशमन दलाला अडथळा: अरुंद रस्ते आणि दाटीवाटीने झालेली ही बांधकामे यामुळे आगीसारखी दुर्घटना घडल्यास अग्निशमन दलाच्या गाड्या पोहचणे कठीण होते.सुरक्षेचा अभाव: कोणत्याही 'फायर ऑडिट'शिवाय चालणाऱ्या या गोडाऊनमुळे आजूबाजूच्या निवासी क्षेत्रालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. ठाणे शहराने स्वच्छतेच्या बाबतीत ३५ व्या क्रमांकावरून १५ व्या क्रमांकापर्यंत मजल मारली आहे. मात्र, दिवा परिसरातील हे अनियंत्रित आणि विद्रुप पत्र्याचे साम्राज्य शहराच्या सौंदर्याला बाधा आणत आहे. जर या अनधिकृत बांधकामांवर वेळीच कारवाई झाली नाही, तर शहराच्या क्रमवारीत पुन्हा घसरण होण्याची भीती नगरसेवक बाबाजी पाटील यांनी याआधीच व्यक्त केली आहे. सौ. अर्चना पाटील यांनी १६ मार्च २०२६ रोजी या संदर्भात सहाय्यक आयुक्तांना पत्र दिले होते मात्र त्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

**पुढील आव्हाने आणि मागणी**

शहराच्या शाश्वत विकासासाठी ही अनधिकृत गोडाऊन जमीनदोस्त करणे आवश्यक आहे.

१. या गोडाऊनची संपूर्ण माहिती लेखी स्वरूपात जाहीर करावी.

२. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी.

३. थकीत मालमत्ता कराची वसुली करून बेकायदेशीर बांधकामांवर त्वरित बुलडोझर चालवावा.

शीळ विभाग व दिवेकरांच्या हितासाठी आणि शहराचा 'स्मार्ट' दर्जा टिकवण्यासाठी महापालिका आयुक्त यावर काय पाऊल उचलतात, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

**प्रशासनाने हा विषय गांभीर्याने घ्यावा. इतके दिवस**



**चालढकल का केली जाते हेच कळत नाही.या ठिकाणी व्यवसाय करणारे स्थानिक नसून बहुतांश हे बाहेरून आलेले आहेत. त्यात बांगलादेशीही असू शकतात. शहराच्या भविष्यासाठी ही गंभीर बाब असून तात्काळ अनधिकृत व बेकायदा गोडाऊन बाबत पालिका आयुक्तांनी सहाय्यक आयुक्तांना निर्देश द्यावेत अशी आमची मागणी आहे.**

**– अर्चना निलेश पाटील, नगरसेविका**

**नगरसेविका अर्चना पाटील यांनी जे पत्र दिले आहे त्याबाबत आम्ही संपूर्ण कारवाईबाबतचा अहवाल त्यांना देणार आहोत. गोडाऊन बाबत परमिशन आम्ही देत नसतो. आणि अशा परमिशन दिलेल्या सुद्धा नाहीत. त्यामुळे असे गोडाऊन आढळल्यास आम्हाला संपर्क साधा आम्ही कारवाई करू.**

**– शिवप्रसाद नागरगोजे**
**सहायक आयुक्त, दिवा प्रभाग समिती**

# कोप्रोली ग्रामस्थांनी काळे पिवळे मार्किंग पट्टे जाळून एमएमआरडीए व राज्य सरकारचा केला निषेध

**उरण । प्रतिनिधी**

एमएमआरडीएने उरण तालुक्यातील कोप्रोली गावच्या वेशीवर काळे पिवळे चौकटीत मार्किंगला केले होते. गुरुवार दिनांक २.४.२०२६ रोजी कोप्रोली ग्रामस्थ व सर्व पक्षांचे प्रमुख कार्यकर्त्यांनी एकत्र येत या मार्किंगला काळे फासून निषेध केला. उपस्थितांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा तीव्र निषेध करत या मार्किंगवर टायर जाळून सरकार आणि एमएमआरडीएला इशारा दिला आहे.

जमीन, घर आणि गाव वाचवा
एमएमआरडीए हटवा
जमीन आमच्या हक्काची
नाही कुणाच्या बापाची

असे नारे देत शेती घरे आणि गाव वाचवण्यासाठी ग्रामस्थांनी एल्गार केला आहे.



तत्पूर्वी एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समितीचे सरचिटणीस रुपेश पाटील यांनी सरकारने तिसऱ्या मुंबईसाठी जाहीर केलेल्या भूसंपादनाच्या शासन निर्णयाची माहिती दिली. सरकारचे धोरण फसवे आणि शेतकरी विरोधी असून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याला बळी पडू नये. आपण संघटीत राहून संघर्ष केला नाही तर भविष्यात आपली मूळ गावठाणाबाहेरील घरेही बेकायदेशीर ठरतील. सरकारने या सर्व घरांना सनद ( प्रॉपर्टी कार्ड ) देऊन सुरक्षित करावे तसेच मूळ गावठाणाबाहेर ५०० मिटर पर्यंत गावठाण क्षेत्र जाहीर करावे. एमएमआरडीएने गावोगावी अशा प्रकारचे मार्किंग करून हद्दी निश्चित करत बेकायदेशीरपणे सर्वेक्षण सुरू केलं आहे. त्याला सर्वत्र विरोध होत आहे. याप्रसंगी समितीचे उपाध्यक्ष चंद्रशेखर ठाकूर, एड. पर्जन्य म्हात्रे, विपुल म्हात्रे, शशिकांत पाटील, प्रवीण म्हात्रे, अमेय पितळे, दिलीप म्हात्रे, हितेश म्हात्रे, अमृत म्हात्रे, निलेश म्हात्रे, धनेश म्हात्रे, अनिकेत ठाकूर, ओमकार गावंड, हर्षद पाटील, ओंकार म्हात्रे, सौरव पाटील, नमोद म्हात्रे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# उरण मध्ये श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

**उरण । प्रतिनिधी**

उरण शहरात तसेच उरण तालुक्यातील विविध ग्रामीण भागात श्री हनुमान जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. पागोटे,हनुमान कोळीवाडा, वेश्वि,वशेणी, करंजा आदी गावात तसेच उरण शहरात भाजी मार्केट बाजारपेठ तसेच गणपती चौकात श्री हनुमान जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा झाला.उरण शहरातील गणपती चौकात श्री हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळ उरण यांच्या वतीने पहाटे ४ वाजता महापूजा, पहाटे ५ वाजता हभप सुधीर विश्वनाथ बाळ यांचे सुश्राव्य असे कितर्न झाले.भाविक भक्तांना कल्पेश ठक्कर यांच्या माध्यमातून उपवासाच्या खिचडीचे वाटप करण्यात आले. सकाळी ८ ते १२ या वेळेत श्री गजानन प्रसादिक भजन मंडळ यांचे भजन झाले. श्री गजानन प्राथमिक भजन मंडळाचे बुवा वसंत मांडेलकर,गणेश सावंत, शैलेश राऊत, भारत पाटील, जगदीश भोईर,भालचंद्र म्हात्रे, कु. वेदांत,सन्नी मांडेलकर आदींनी उत्तम असे भजन गाऊन रसिक प्रेषक भाविक भक्तांना मंत्र मुग्ध केले.दुपारी १२ ते ३ या वेळेत कै. सुनिता महादेव ढोले, कै. मीना के रूपचंदानी यांच्या स्मरणार्थ महाप्रसाद देण्यात आले.त्यानंतर शारदा संगीत भजन मंडळ विचुंबे यांचे भजन झाले. शेवटी पालखी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीला श्री गजानन प्रासादिक भजन मंडळाची साथ संगत लाभली.मंदिरात श्री हनुमान मूर्तीचे दर्शन घेतलेल्या विविध प्रतिष्ठित मान्यवरांचे यावेळी शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.दिवसभर चाललेल्या विविध कार्यक्रमांना भाविक भक्तांचा उत्तम प्रतिसाद लाभला.भाविक भक्तांची दिवसभर गर्दी पहावयास मिळाली. सर्वच भावीक भक्तांनी शांततेत रांगेत उभे राहून शिस्तीने दर्शन घेतले.सर्वच कार्यक्रम उत्तमपणे संपन्न झाले.सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अशोक कडू, उपाध्यक्ष महेश अधिकारी, कार्याध्यक्ष विपुल पारेख, सचिव ऍड.रोहित पाटील, सहसचिव ऍड.रेखा पाटील, खजिनदार धनंजय भागवत, सहखजिनदार मनोज म्हात्रे,सल्लागार विठ्ठल ममताबादे,व्यवस्थापक निर्मला ममताबादे, ह भ प भालचंद्र म्हात्रे, रघुनाथबुवा हातनोलकर यांच्यासह सर्व कार्यकारी पुरुष सभासद, कार्यकारी महिला सभासद - सुविधा म्हात्रे,प्राजक्ता भागवत, मिलिंदा माळी यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.



# पनवेल महानगरपालिका सर्वसाधारण सभेत सार्वजनिक शौचालय निविदांच्या फुगीर रक्कमेवरुन खडाजंगी

## कामाला विरोध नाही पण कामांच्या रक्कमा पनवेल करांची लुटणार करणाऱ्या-विरोधकांची आक्रमक भूमिका

**पनवेल । प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेची महासभा दिनांक १एप्रिल रोजी महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये संपन्न झाली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही महासभा घेण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. पण कामाच्या रक्कमा एवढ्या फुगविण्यात आल्या आहेत की यातून पनवेलकरांची लूट केली जाणार आहे . कामाच्या रक्कमा वरून विरोधक आक्रमक झालेले पाहायला मिळाले. विकासाला विरोध नाही पण यातून जनतेची लूट होत असेल तर आमचा विरोध असेल अशी ठाम भूमिका विरोधकांनी घेतली.

यावेळी मंचावर उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे उपस्थित होते. तर सभागृहात सभागृह नेते,विविध समित्यांचे सभापती, विरोधी पक्ष नेत्यांचा सर्व महापालिका सदस्य उपस्थित होते. सभेची सुरुवात वंदे मातरम तसेच महाराष्ट्र गीताने झाली. त्यानंतर झालेल्या कामकाजात काही अभिनंदनचे ठराव व श्रद्धांजली ठराव मंजूर करण्यात आले.कामकाज पत्रिकेनुसार सदस्य प्रवीण पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्यपदी माजी सभागृह नेते व नगरसेवक परेश ठाकूर यांची नियुक्ती करण्याचा विषय मंजूर करण्यात आला. प्रश्नोत्तरांच्या तासांमध्ये महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागातील पाणी पुरवठा समस्येवर चर्चा करण्यात आली. न्हावा शेवा पाणी योजना, अतिरिक्त टँकर मागणी, याबाबत आयुक्त मंगेश चितळे यांनी यावेळी माहिती दिली. तसेच याबाबत चर्चा करण्यासाठी विशेष बैठक घेण्याविषयी महापौरांनी निर्देश दिले.

वैद्यकीय अधिकारी शरद वसंतराव पाटील, गट-अ, यांच्या नियुक्तीस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळण्याचा विषय यावेळी मंजूर करण्यात आला.पनवेल महानगरपालिकेच्या ०२ डायलॅसीस युनिटमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वापरण्यात येणाऱ्या मेडिकल गॅस सिलेंडरचे कंत्राटी तत्वावर मेडिकल गॅस रिफलिंग करुन घेणेकरिता एजन्सीची नेमणुक करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविणे व त्याकरिता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबचा विषयांवर चर्चा करून विषय मंजूर करण्यात आला.पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना व बालकांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत रक्त पुरवठा व रक्त संक्रमण करणेस व खाजगी, स्वंयसेवी, शासकीय व अशासकीय, धर्मादाय संस्थेच्या रक्तपेढ्यामधुन रक्त पुरवठा करणेकामी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) मागविणेस मान्यता मिळणे बाबतच्या विषयावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली व विषय मंजूर करण्यात आला.पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड मधील विविध ठिकाणी असलेल्या पनवेल महानगरपालिका मालकीच्या सर्व सार्वजनिक शौचालयांची आवश्यकतेनुसार दोन वर्षासाठी दुरुस्ती व नुतनीकरण करणे या कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणे बाबतच्या विषय मंजूर करण्यात आला.पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. व एक वर्षासाठी या विषयास मंजूरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिका मालकीचे अं.भु.क्र.१२२ प्रायमरी स्कूल व प्ले ग्राऊंड आरक्षित भुखंड जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल या संस्थेस ३० वर्षे कालावधीकरीता लिज भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबतचा विषय स्थगित करून पुर्न मान्यतेसाठी सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.पनवेल महानगर पालिकेमार्फत प्रशासक कालावधीत केलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती स्वतंत्र पेनड्राईव्ह मध्ये सर्व सन्माननीय नगरसेवकांना देण्यात आली आहे. कदाचित राज्यातील हा पहिला प्रयोग असावा. महानगरपालिकेत प्रशासक कार्यकाल सुरू झाल्यापासून ते प्रशासक कार्यकाल संपेपर्यंत जे काही निर्णय घेतले, उपक्रम राबविले त्याची संपूर्ण माहिती सर्व सन्माननीय नगरसेवकांना देण्यात आली आहे.पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या सर्वांगीण सुविधेसाठी प्रशासन सातत्याने कार्यरत आहे. यात प्रामुख्यानेव आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, नागरी सुरक्षा, पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन तसेच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला व बालकल्याण विषयक संदर्भात सर्व अनुषंगिक बाबींसाठी अत्यंत जागरूकतेने प्रशासनाने काम केलेले आहे. त्याची सर्व सविस्तर माहिती, लेखाजोखा देण्यात आलेला आहे.

### अभिनंदनाचा प्रस्ताव

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिकेने उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सन्मानित करण्यात आल्याबद्दल आजच्या महासभेत महापालिका सदस्यांनी आयुक्त मंगेश चितळे यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आला.**

### प्रशासन पूर्णत: पारदर्शी

**या सर्वसाधारण सभांमध्ये विषय पत्रिकेवरील मुद्द्यांना उत्तर देताना आयुक्त मंगेश चितळे यांनी सविस्तरपणे व समर्पक पणे प्रशासना मार्फत केलेल्या कामकाजाची माहिती दिली. एकूणच प्रशासन पूर्णत: पारदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.**

# रायगड किल्ला पाहून मी धन्य झाले-रागिणी नायक

## काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ.रागिणी नायक, जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत रायगडावर!

**उलवे । प्रतिनिधी**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार प्रत्यक्षात जगणारे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत, तसेच काँग्रेसच्या दिल्लीतून आलेल्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक बुधवारी (ता.१) सकाळी रायगड किल्ल्यावर शिवरायांच्या चरणी नतमस्तक झाले. यावेळी रायगड किल्ला आणि शिवरायांची महती फक्त ऐकून असलेल्या रागिणी नायक रायगड किल्ला 'याचि देही याचि डोळा' पाहून भारावून गेल्या. शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. असा राजा जगात झाला नाही आणि होणारही नाही. जेथे शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. तोच हा रायगड किल्ला! असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी राष्ट्रीय प्रवक्त्या रागिणी नायक यांना सांगितले. 'आज



मी शिवाजी महाराज यांचा रायगड किल्ला पाहून धन्य झाले!' असे उद्गार रागिणी नायक यांनी यावेळी काढले. यावेळी शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, युवक अध्यक्ष निखिल ढवळे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आपण चारचाकी घेतली; हिचा वापर आपल्या घरगुती कामा बरोबर बौद्ध धम्म प्रसारासाठी करणार!

**मुंबई । प्रतिनिधी**

महामानव बौद्धीसत्व प.पूज्य विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच सुखसोयी आपणास प्राप्त झाल्याने समाजबांधव धम्मबंधू अतुल खंडेराव मोरे यांनी चारचाकी मारूती सुजीकी कंपनी क्रमांक एम एच ०३ एफ डी १५४५ महागडी गाडी खरेदी केली आणि भिक्खू संघाच युनायटेड बुध्दीस्ट मिसन सर्वोदय महाबुध्दविहार टिळकनगर चेंबूर पश्चिम मुंबई येथे महाथेरो विपश्यनाचार्य भन्ते डॉ.राहूल बोधी यांच्या शुभ हस्ते बौद्ध संस्कार पध्दतीने पुजापाठ करून मोठ्या उत्साहात उद्घाटन सोहळा संपन्न केला असता भन्ते यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आपणास चार चाकी गाडी मिळाली, आपल्या समाज्याला वैभव प्राप्त होवून प्रगतीपथावर गेला पण अजूनही बौद्ध धम्म प्रचार प्रसार होवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत बौद्धमय करण्यासाठी आपण सर्वानी बौद्ध धम्माचा प्रचार प्रसार केला पाहिजेत.या कामी आपले वाहने उपयोगात आली पाहिजेत सदर अतुल मोरे यांची गाडी त्यांच्या घरगुती कामा बरोबरच धम्म प्रचार प्रसारसाठी कामी येईल असा




विश्वास व्यक्त करून मंगल मैत्रिचा आशिर्वाद दिला.सदर प्रसंगी सर्वश्री रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे केंद्रीय सरचिटणीस आत्माराम पाखरे,रिप.पँथर जेष्ठ नेते,भाई कदम, समाजभूषण सो.ना.कांबळे.उपाध्यक्ष मुं.प्र.रिप पक्ष आ, रिप. ए. फे. केंद्रीय खजिनदार सिद्धार्थ रणपिसे,सामाजिक नेते शैलेंद्र मस्के,अतुल मोरे यांचे कुटुंबीय बहिणबाई शलाका मोरे,भावजय वैशाली मोरे,आदिने मान्यवरांना पेढे,मिठाई वाटप करून चार चाकी गाडी घेतल्याचा आनंदोत्सव साजरा केल्या प्रंसगी अतुल मोरे यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छा वर्षा होत आहे.

# पुण्यात पडलेला अवकाळी पावसाने प्रशासनाचे उखळ पांढरे

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे शहरात पडलेला अवकाळी पावसाने शहराची दैना दिसत होती कोथरूड,शिवाजीनगर,कर्वेनगर,सिंहगड रोड, बाणेर अशा अनेक ठिकाणी रोडवर पाणीच पाणी साचलेले दिसत होते यात वाहन चालकांची दैना तर झालेली दिसत होती तर अनेक ठिकाणी घरात पाणी ,दूकानात पाणी साचल्याने अनेकांचे नूकसान झालेले होते अनेक ठिकाणी चेंम्बरची दूरावस्था, खालीवर चेंम्बर, नाल्या मध्ये कचरा, रोडवर माती, दगड खडी वाळू सारखे प्रकार दिसत असतांनाही महापालिकेचे अधिकारी झोपा घेतात काय तसेच महापालिका यावर करोडो रूपये निधी उपलब्ध करणे मग तो निधी फक्त ठेकेदार आणि अधिकारी यांच्या घश्यात घातला जातो काय तसेच उन्हाळ्या नंतर पावसाळा सूरू होणार याचे नियोजन आता पासून करणे गरजेचे असतांनाही महापालिकेचे अधिकारी झोपा काढत आहे यात जनता भरडली जात आहे याचे नियोजन आता पासून का करण्यात येत का नाही याचे उत्तर जनतेला महापालिकेने द्यावे





# पनवेल–अलिबाग एसटी सेवा ठप्प रात्री प्रवाशांची गैरसोय वाढली

**अलिबाग । ओमकार नागावकर**

पनवेलहून अलिबाग, रेवदंडा, मुरुड आणि वडखळ या भागात जाणाऱ्या प्रवाशांना रात्री ८ ते ८.३० नंतर एसटी बस उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या वेळेनंतर नियमित बस सेवा थांबत असल्याने प्रवाशांना इतर अनियमित गाड्यांवर अवलंबून राहावे लागते. मुंबईहून कामानिमित्त येणाऱ्या चाकरमान्यांना रात्री उशिरा आल्यानंतर राहण्यासाठी लॉज शोधावी लागते किंवा एसटी स्थानकातच रात्र काढावी लागते. या समस्येमुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सामाजिक कार्यकर्ते देवव्रत विष्णू पाटील यांनी सांगितले की, स्थानिक लोकप्रतिनिधी एसटीने प्रवास करत नसल्याने त्यांना नागरिकांच्या अडचणींची जाणीवच होत नाही.



**वडखळ प्रवाशांचे हाल; वाहतूक सुविधांची कमतरता**

रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचे केंद्र असलेल्या वडखळ गावातही एसटी सेवेकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. रात्री ९ नंतर पनवेलहून वडखळकडे जाण्यासाठी अलिबाग मार्गाव्यतिरिक्त इतर बस थांबत नसल्याची तक्रार प्रवासी राजेश म्हात्रे यांनी केली आहे. प्रवाशांनी विनंती करूनही अनेकदा कंडक्टर नकार देतात, तसेच काही बस स्थानकात थांबतच नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

**लोकप्रतिनिधींविषयी वाढती नाराजी**

या प्रश्नावर खासदार, आमदार किंवा जिल्हा परिषद सदस्यांकडून कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे. निवडून दिलेल्या प्रतिनिधींना जाब विचारावा, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. देवव्रत पाटील यांनी वडखळ, अलिबाग, रेवदंडा आणि मुरुडसाठी अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करण्याची मागणी केली आहे.

**डेपो व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह**

पनवेल व अलिबाग एसटी डेपोच्या कामकाजावरही संशय व्यक्त केला जात आहे. खासगी वाहनचालक प्रवाशांकडून जादा भाडे (सुमारे ३०० रुपये) आकारून त्यांची लूट करत असल्याच्या तक्रारी आहेत. काही नागरिकांनी एसटी अधिकाऱ्यांसोबत संगनमत असल्याचाही आरोप केला आहे.

तसेच, डेपोमधील संपर्क क्रमांक कायम व्यस्त किंवा बंद असतात आणि अधिकाऱ्यांचे वर्तन उद्धट असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत.

**प्रवाशांच्या अपेक्षा वाढल्या; तातडीच्या उपाययोजनांची गरज**

शासनाकडून चांगल्या सेवांची अपेक्षा असताना प्रत्यक्षात एसटी सेवा कोलमडलेली दिसत आहे. चालक व कंडक्टरांची कमतरता, जुन्या बस आणि विस्कळीत वेळापत्रक यामुळे प्रवासी त्रस्त आहेत. रात्रीच्या अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करणे, वडखळ येथे बस थांबे वाढवणे आणि डेपोमधील गैरप्रकारांची चौकशी करणे, या मागण्या आता जोर धरत आहेत.

# पनवेलमध्ये आरोग्य क्रांतीचा सभापती सौ.ममताताई प्रितम म्हात्रे यांचा ठोस प्रस्ताव



**पनवेल । प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका सभागृहात आज झालेल्या बैठकीत महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममताताई प्रितम म्हात्रे यांनी मातृ-शिशु आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा व दूरदृष्टी असलेला प्रस्ताव मांडला.या सभेला सन्माननीय महापौर, आयुक्त, उपमहापौर, सभागृह नेते, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्ष नेते तसेच सर्व नगरसेवक आणि पत्रकार उपस्थित होते.

सभागृहात विषय मांडताना सभापती सौ. ममताताई प्रितम म्हात्रे यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या, दरवर्षी नोंद होणाऱ्या हजारो गरोदर माता आणि त्यापैकी मोठ्या प्रमाणावर असलेल्या 'हाय-रिस्क' मातांचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. गरोदर माता आणि नवजात बालकांना वेळेवर व सुरक्षित रक्त उपलब्ध होणे ही अत्यंत महत्त्वाची गरज असून, सध्या त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खाजगी रक्तपेढ्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर मातृ-शिशु मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार व विनामूल्य आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी खालील महत्त्वपूर्ण उपाययोजना त्यांनी सुचवल्या –

महानगरपालिकेची स्वतःची सुसज्ज व अत्याधुनिक मॉडेल ब्लड बँक उभारावी

१०८ रुग्णवाहिका सेवेच्या धर्तीवर 'ब्लड ऑन कॉल' सेवा सुरू करावी

हाय-रिस्क मातांसाठी डेटाबेस व ट्रॅकिंग सिस्टम विकसित करावी व पोषण योजना राबवावी

महिला व बालकल्याण समितीमार्फत रक्तदान जनजागृती व महिला रक्तदान शिबिरे आयोजित करावीत

खासगी रुग्णालये व रक्तपेढ्यांचे ऑडिट करून पारदर्शकता सुनिश्चित करावी.या प्रस्तावामागील मुख्य उद्देश स्पष्ट करताना त्यांनी ठामपणे सांगितले की, कोणत्याही मातेला रक्तासाठी एकही रुपया मोजावा लागू नये आणि रक्ताच्या अभावामुळे एकही माता किंवा बालकाचा जीव धोक्यात येऊ नये. यावेळी त्यांनी पुढे सांगितले की, देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल होत असून, सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या तत्वानुसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवण्यावर भर दिला जात आहे. भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेनुसार महिला सक्षमीकरण, मातृ-शिशु संरक्षण आणि सर्वांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करणे हे सर्वोच्च प्राधान्य आहे. पनवेल महानगरपालिका देखील याच धर्तीवर काम करत, मातृ-शिशु आरोग्य क्षेत्रात राज्यात आदर्श निर्माण करण्यासाठी पुढाकार घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.भाजपा नेते श्री. प्रितम म्हात्रे म्हणाले की,भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेनुसार महिला व बालकल्याण आणि सर्वसामान्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणे ही आपली भूमिका आहे. सभापती सौ. ममताताई प्रितम म्हात्रे यांनी प्रशासनाशी समन्वय साधत अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदृष्टीचे विषय सभागृहात मांडले असून, हा प्रस्ताव पनवेलच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करणारा ठरेल.शेवटी, माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित या भावनेतून मांडलेल्या या प्रस्तावास सभागृहाने एकमताने पाठिंबा द्यावा व प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी सुरू करावी, अशी विनंती सभापती सौ.ममताताई प्रितम म्हात्रे यांनी केली.

# ठाणे महापालिकेचा कचरा डब्यांचा 'मिसिंग स्कॅम'; काँग्रेस आक्रमक

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे शहर काँग्रेसने ठाणे महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापनातील गंभीर अनागोंदीचा मुद्दा



आक्रमकपणे उचलून धरताच प्रशासनाची झोप उडाली आहे. लाखो रुपयांचा खर्च करून बसविण्यात आलेले स्टेनलेस स्टील कचरा डबे अल्पावधीतच गायब झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, अनेक ठिकाणी फक्त लोखंडी स्टँड उभे असल्याने या प्रकरणात मोठा घोटाळा झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे मुख्य प्रवक्ता राहुल पिंगळे यांनी प्रशासनावर थेट हल्लाबोल चढवला आहे. ठाणे शहरातील विविध भागात सुस्थितीत असलेले अनेक कचरा डबे अयोग्य पद्धतीने बसविल्यामुळे उखडून रस्त्याच्या कडेला व पदपथांवर दिवसानुदिवस पडून आहेत. तरीदेखील प्रशासनाकडून याकडे होत असलेले दुर्लक्ष नागरिकांच्या संतापात भर घालत आहे. करदात्यांच्या पैशाचा होत असलेला हा उघड अपव्यय थांबवण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी राहुल पिंगळे यांनी केली आहे. याबाबत स्मार्ट सिटी, आमदार निधी, खासदार निधी आदी विविध स्रोतांमधून बसविण्यात आलेल्या सर्व कचरा डब्यांचे फिजिकल ऑडिट करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागील पाच वर्षांतील खर्च, डब्यांची गुणवत्ता, तसेच प्रत्यक्षात ते डबे संबंधित ठिकाणी अस्तित्वात आहेत की नाहीत, याचा सविस्तर अहवाल सार्वजनिक करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.ठाणे शहरभर विखुरलेले व पडून असलेले स्टील कचरा डबे तातडीने संकलित करून आवश्यक त्या ठिकाणी पुन्हा बसवावेत, तसेच भविष्यात गरजेनुसारच डबे बसविण्याचे धोरण राबवावे, अशी सूचनाही करण्यात आली आहे. संबंधित विभागांवर जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटिंग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)